अनुसूचित क्षेत्रात कार्यरत ग्रामपंचायत अधिकारी यांना अनुसूचित क्षेत्राबाहेर समाजोजनाने पदस्थापना देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-१६३/२०२५
दिनांक२४/०३/२०२५

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीबीसी/२०२३/प्र.क्र.५४/आरक्षण/५ दि.०५/१०/२०२४.
२.ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दि.१५ मे २०१४.
३.जिल्हा निवड समिती अहिल्यानगर यांचेकडील निवडयादी दि.२८/०२/२०२५.
४. अनुसूचित क्षेत्रात कार्यरत ग्रामपंचायत अधिकारी यांना अनुसूचित क्षेत्राबाहेर पदस्थापना देणे बाबत समुपदेशन प्रक्रिया दि.२१/०३/२०२५.

-- आदेश --

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेने एकुण ११ उमेदवारांना अनुसूचित (पेसा) क्षेत्रात मानधन तत्वावर कंत्राटी ग्रामसेवक ( ग्रामपंचायत अधिकारी ) म्हणून पंचायत समिती अकोले येथे नियुक्ती दिली आहे. सदर उमेदवारांना अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये नियुक्ती देणे आवश्यक होते, तथापि अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायत अधिकारी कार्यरत असल्यामुळे सदर ग्रामपंचायत अधिकारी यांचे समायोजन करणे आवश्यक होते त्यामुळे अनुसूचित क्षेत्रात कार्यरत असलेले तथापि अनुसूचित क्षेत्राचे रहिवासी नसलेले बिगर अनुसूचित जमाती प्रवर्गातील पुढील ग्रामपंचायत अधिकारी यांना अनुसूचित क्षेत्राबाहेरील रिक्त ग्रामपंचायती मध्ये संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयात दिलेल्या निर्देशाप्रमाणे पुढील प्रमाणे समायोजनाने पदस्थापना देऊन पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होणेसाठी या आदेशाच्या दिनांकापासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यरत ग्रामपंचायत अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे कार्यालय | | समायोजीत करण्यात आलेले कार्यालय | |
|---|---|---|---|---|---|
| | | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.घुमरे दत्तात्रय हौसराव | अकोले | पिंपळदरावाडी | अहिल्यानगर | पारगाव भातोडी |
| २ | श्री.मुळे अंकुश सूर्यभान | अकोले | मुथाळणे | कर्जत | रवळगाव |
| ३ | श्री.जानेकर गौतम रोहिदास | अकोले | केळी ओतूर | संगमनेर | आश्वी बु. |
| ४ | श्री.देशमुख भारत सूर्यभान | अकोले | आंबेवंगण | संगमनेर | धांदरफळ बु. |
| ५ | श्री.मंडलिक सुरेश विजय | अकोले | मान्हेरे | संगमनेर | तळेगाव दिघे |
| ६ | श्री.पवार किशोर रावसाहेब | अकोले | चिचोंडी | अकोले | देवठाण |
| ७ | श्रीम.पटारे ज्योती सर्जेराव | अकोले | गुहिरे | अकोले | अंबड |
| ८ | श्री.जाधव अमोल अनंतराव | अकोले | रतनवाडी | पारनेर | लोणीमावळा |
| ९ | श्री.घनवट बाळू दत्तात्रय | अकोले | शेलविहिरे | नेवासा | पाथरवाला |

गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोले यांनी वरील कर्मचा-यांना समायोजित करण्यात आलेल्या ठिकाणी हजर होणेसाठी त्यांचेकडील कार्यभाराबाबत पर्यायी व्यवस्था करून तातडीने कार्यमुक्त करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

सदरचा आदेश हा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202503240600027 असा आहे.

( आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. संबंधित कर्मचारी, व्दारा गटविकास अधिकारी, संबंधित पंचायत समिती अकोले

२/- संबंधित कर्मचारी यांनी आदेशात नमूद केलेप्रमाणे समायोजित ठिकाणी हजर व्हावे. सदर आदेशाची अंमलबजावणी न केल्यास अथवा कुठलाही दबाव आणल्यास आपणाविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती ---------------संबंधित ग्रामपंचायत अधिकारी हजर झालेबाबत अहवाल या कार्यालयास सादर करावा.

( आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर